POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२५२ ● मुंबई, सोमवार, १४ एप्रिल २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्टच्या तेराव्या वर्धापन दिनानिमित्त स्नेहसंमेलनाचे आयोजन



**■नाशिक | प्रतिनिधी :**

आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्टच्या तेराव्या वर्धापन दिनानिमित्त नाशिक येथे स्नेहसंमेलनाचे आयोजन उत्साहात आणि सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडले. या कार्यक्रमात ट्रस्टचे सर्व पदाधिकारी, सदस्य तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि सरस्वती पूजनाने झाली. यानंतर ट्रस्टच्या गेल्या तेरा वर्षांतील सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कायार्चा संक्षिप्त आढावा सादर करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी ट्रस्टच्या कायार्ची प्रशंसा करत आगामी काळातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. स्नेहसंमेलनात नामवंत व तज्ञ डॉक्टरांच्या वतीने त्यांचे अनुभव आणि समाजात पसरत चाललेल्या थैलेसिमिया ॲनिमिया या विविध आजारावरती आपले अनुभव सांगून सर्व ट्रस्टच्या सदस्यांना पुढील कार्यक्रम कशा पद्धतीने आयोजित करायचा व त्याच्यावरती कोणत्या प्रकारे उपाययोजना करायची या बाबतीत मार्गदर्शन करून आश्रय ट्रस्ट बरोबर अनेक कॉलेजने केलेल्या सामंजस्य करारावरती वर्षभरामध्ये कशा पद्धतीने नियोजन करायचे याबद्दल मार्गदर्शन केले. यामुळे संपूर्ण वातावरणात उत्साहाची लहर उमटली. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सदस्यांचा सन्मान करून त्यांना गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या सांगता प्रसंगी ट्रस्टच्या वतीने सर्व मान्यवर व उपस्थितांचे आभार मानण्यात आले. तसेच पुढील वर्षी आणखी व्यापक आणि लोकसहभाग वाढवणारा कार्यक्रम आयोजित करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.















**■मुंबई | प्रतिनिधी :**

आगामी पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोन्ही शिवसेनेकडून तयारी सुरु करण्यात आलीय.. ठाकरेंच्या शिवसेनेच्या बैठकीत उद्धव ठाकरेंनी पदाधिकाऱ्यांना तयारीला लागण्याचे आदेश दिले आहेत. तर तिकडे पालिकेवर महायुतीचाच झेंडा फडकणार असा दावा एकनाथ शिंदेंकडून करण्यात आलाय. आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोन्ही शिवसेनेकडून रणशिंग फुंकण्यात आलंय. मातोश्रीवर झालेल्या बैठकीत मुंबईतील पदाधिकाऱ्यांना कानमंत्र देत तयारीला लागण्याचे आदेश उद्धव ठाकरेंनी दिलेत. तर दुसरीकडे मुंबई महानगर पालिकेवर महायुतीचा झेंडा फडकणार असल्याचा विश्वास एकनाथ शिंदेंनी व्यक्त केलाय. आगामी काळातील निवडणुका लक्षात घेता ठाकरेंची शिवसेना मुंबईतील विविध मुद्द्यावरुन चांगलीच आक्रमक झालीय. मुंबईतील टँकर चालकांनी संप पुकारलाय त्यामुळे पाणी प्रश्नावरुन आदित्य ठाकरेंनी सरकारला अल्टिमेटम दिलाय. दरम्यान यानंतर एकनाथ शिंदेंनी ठाकरेंच्या शिवसेनेवर पलटवार केलाय. आदित्य ठाकरेंनी दिलेल्या मोर्चाच्या इशाऱ्यावरुन भाजप आमदार प्रसाद लाड यांनी देखील प्रत्युत्तर दिलंय. आदित्य ठाकरेंनी मुंबई पालिकेसंदर्भात बोलू नये असं म्हणत प्रसाद लाड यांनी शरसंधान साधलंय. आगामी पालिका निवडणुकींसाठी दोन्ही शिवसेनेकडून मोर्चेबांधणी सुरु करण्यात आलीय.. ठाकरेंची शिवसेना मुंबईमधील विविध प्रश्नावरुन आक्रमक झालीय.. तर दुसरीकडे निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिंदेंच्या शिवसेनेत इनकमिंग सुरुय. त्यामुळे दोन्ही शिवसेनेकडून चांगलाच जोर लावला जात असून आगामी काळात पालिकेचं मैदान कोण मारणार? याकडे आता लक्ष लागलंय.

## शिंदे-फडणवीस कोणीही नाही... अमित शाहांना निरोप द्यायला भाजपचा 'हा' नेता सहकुटुंब एअरपोर्टवर गेला

**■मुंबई | प्रतिनिधी :**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे दोन दिवसीय महाराष्ट्र दौऱ्यावर आले होते. ११ एप्रिलला रात्री अमित शाह हे पुण्यात दाखल झाले. तर १२ एप्रिलला अमित शाह हे रायगड येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीच्या कार्यक्रमात सहभागी झाले. तसेच अमित शाह हे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे खासदार सुनील तटकरे यांच्या घरी भोजनासाठी गेले होते. यानंतर ते मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात मुक्कामी होते.

रविवारी १३ एप्रिल रोजी अमित शाह हे मुंबईहून भोपाळकडे रवाना झाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



किंवा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे अमित शाह यांना एअरपोर्टवर सोडायला जातील, अशी शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र एअरपोर्टवर सोडवायला शिंदे-फडणवीस नव्हे तर भाजप नेते मंगलप्रभात लोढा हे सहकुटुंब गेल्याचे दिसून आले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे आज सकाळी सह्याद्री अतिथी गृहावर असताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांची भेट घेतली. दोघांमध्ये तब्बल अर्धा तास चर्चा देखील झाली. यानंतर अमित शाह हे भोपाळकडे रवाना झाले. यावेळी भाजप नेते मंगलप्रभात लोढा हे अमित शाह यांना भोपाळला सोडवायला गेल्याचे पाहायला मिळाले. एअरपोर्टवर जाताना गाडीत अमित शहा यांच्या मांडीवर एक छोटी मुलगी आणि मागे दोन छोट्या मुली आणि एक महिला बसली होती. हे कुटुंब मंगलप्रभात लोढा यांचे असल्याची माहिती मिळत आहे.

दरम्यान, अमित शाह यांच्या दौऱ्यात भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी देखील त्यांची भेट घेतली आहे. मे महिन्यात अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीच्या त्रिशताब्दी वर्षानिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन पुण्यात करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे निमंत्रण पडळकर यांनी अमित शाह यांना दिले आहे. तर अमित शाह यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे वचन दिल्याची माहिती गोपीचंद पडळकर यांनी एक्सवर पोस्ट करत दिली आहे.



### पालकमंत्रिपदाचा तिढा सुटणार? शाहांची शिंदेंशी भेट, तटकरेंच्या घरी स्नेहभोजन

मुंबई : राज्यात महायुतीचं सरकार आता स्थिरस्थावर झालंय, मात्र तरीही रायगडच्या पालकमंत्रिपदाचा तिढा काही सुटत नाहिये. शिवसेना आणि राष्ट्रवादीमध्ये पालकमंत्रिपदासाठी अजुनही रस्सीखेच सुरू आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांच्या दौ-यानंतर पालकमंत्रिपदाचा तिढा सुटल्याची चर्चा आहे.

रायगडच्या पालकमंत्रिपदाच्या तिढ्याचं अजुनही भीजत घोंगडं आहे. त्यातच केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांच्या रायगड दौ-यानंतर तिढ्यावर तोडगा निघेल अशी शक्यता होती. मात्र अजूनही अधिकृत कोणतीही घोषणा झाली नाही. सरकार मधील शिवसेना आणि राष्ट्रवादी हे दोन्ही पक्ष पालकमंत्रिपद सोडायला तयार नाही. त्यामुळे गेल्या चार महिन्यांपासून जिल्ह्याला पालकचं नाहिये. दरम्यान रायगड पालकमंत्री पदाचा तिढा लवकर सुटेल अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली.

दरम्यान पालकमंत्रिपदावरून राष्ट्रवादीचे प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील यांनी सरकारला टोला लगावला आहे. रायगडच पालकमंत्री पद आदिती तटकरे यांना जाहीर केलं मात्र महिलेवर कसा अन्याय केला जातो आणि जिल्ह्याला विकासापासून दूर कसे ठेवलं जातं, हे आपण पाहतोय असं पाटलांनी म्हंटलय.

रायगडमध्ये काल केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी सुनिल तटकरेंच्या घरी स्नेहभोजन केलं. आज एकनाथ शिंदे आणि अमित शाहांमध्ये तासभर चर्चा झाली. चचेर्नंतर शिंदेंनी भरत गोगावलेंना तातडीने मुंबईला बोलावून घेतलंय. त्यामुळे पालकमंत्रीपद कुणाच्या वाट्याला जाणार याबाबत शंकाच आहे. पण गेल्या अनेक महिन्यांपासून पालकमंत्रिपदापासून वंचित असलेल्या जिल्ह्याला आतातरी पालकमंत्रि मिळणार का याकडेच लक्ष आहे.

## राज्याला अवकाळी पावसानं झोडपलं, कुठे-कुठे पाऊस?

**■मुंबई | प्रतिनिधी :**

राज्यात अवकाळी पाऊस सुरू आहे, गेल्या काही दिवसांपासून पडत असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे. हातातोंडाशी आलेल्या घास निसर्गानं हिरावून घेतला आहे. दरम्यान आज पुन्हा एकदा राज्यातील अनेक भागांमध्ये वादळी वाऱ्यासह पावसानं हजेरली लावली.

जळगाव जिल्ह्यात सलग दुसऱ्या दिवशी गारपिटीसह अवकाळी पाऊस झाला आ-हे, जळगाव, यावल, चोपडा तालुक्यातील अनेक भागांमध्ये गारपिटीसह जोरदार पाऊस झाला. चोपडा तालुक्यातील अडावद, धानोरा,मितावली शिवारात जोरदार गारपीट झाली आहे. दुसरीकडे जळगाव तालुक्यातील भादली, खेडी भोकर, भोकर, तसेच यावल तालुक्यात मोहराळा सावखेडा यासह इतर गावांमध्ये देखील गारपिटीसह पाऊस झाला आ-हे. या गारपिटीमुळे शेतातील रब्बी हंगामातील गहू, कांदा, केळी, मका व इतर पिकांसह फळपिकांना मोठा फटका बसला आहे. चोपडा तालुक्यात अंदाजे साडेतीनशे हेक्टरवरील पिकांचं नुकसान झाले असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. सकाळी कडाक्याचं ऊन पडलं असताना, दुपारच्यावेळी अचानक ढग दाटून आले आणि पावसाला सुरुवात झाली.

दुसरीकडे पुणे जिल्ह्याला देखील पावसानं चांगलंच झोडपून कढलं आहे, पुणे जिल्ह्याच्या जुन्नर तालुक्यातील अनेक गावांमध्ये आज वादळी वारा आणि विजांच्या कड-कडाटासह जोरदार पाऊस झाला. अचानक पडलेल्या या पावसामुळे शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे. फळबागांना मोठा फटका बसल्याचं दिसून येत आहे. मात्र दुसरीकडे पावसानं हवेत गारवा निर्माण झाल्यामुळे कडाक्याच्या उन्हापासून नागरिकांना दिलासा मिळाला आहे.




### अजून किती तापणार?

सध्या देशातील काही भागात सूर्य आग ओकतोय. या भागात तापमान आताच ४० अंशांच्या पुढे गेले आहे. अजून तर मे महिना जायचा आहे. त्यामुळे यंदाचे वर्ष हे सर्वात उष्ण ठरणार का? असा सवाल विचारला जात आहे. गेल्यावर्षापेक्षा यंदा जास्त ऊन पडलं तर काय होईल, याची भीती नागरिकांना सतावत आहे. देशात १९०१ नंतर वर्ष २०२४ मध्ये उष्णतेने नवनवीन रेकॉर्ड केले होते. यंदा तर एप्रिल महिन्याच्या सुरुवातीलाच भीषण उष्णतेची लाट आली आहे. त्यामुळे गेल्या वर्षीपेक्षा २०२५ हे सर्वात हॉट ठरेल का? याची चर्चा होत आहे. उत्तर आणि पश्चिम भारतातील अनेक शहरात सध्या अशीच स्थिती आहे. महाराष्ट्रातील अनेक शहरात पाऱ्याने डोळे वटारले आहेत. भीषण गर्मी आणि दमट वातावरणामुळे अनेक भागात उकाडा असह्य झाला आहे. घरातून बाहेर पडणे अवघड झाले आहे. त्यामुळे एप्रिलनंतर मे आणि जून हे सर्वाधिक उष्ण महिने असतील का, असा सवाल विचारला जात आहे. पण मध्यंतरी हवामानात बदल झाल्याचे दिसले. राज्यातील अनेक भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे पारा खाली आला. विदर्भ, मराठवाड्यातील काही जिल्ह्यातल पारा 4५०० अंकांचा काटा पार कडून पुढे सरकला आहे. तर मुंबईत पारा ३५ अंशांच्या घरात पोहचला आहे. त्यामुळे उन्हात फिरता काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बुलडाणा जिल्ह्यात उष्माघाताचा एक बळी गेला आहे. त्यामुळे दुपारी उन्हात बाहेर पडताना काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## काल शिव्या शिकवल्या आणि आज... महाराष्ट्रात येणाऱ्या परदेशी पर्यटकांना वेगवेगळे अनुभव

**■मुरबाड | प्रतिनिधी :**

सिंहगड किल्ल्यावर पर-देशी पर्यटकाला टवाळखोरांनी शिव्या शिकवल्याची घटना ताजी असताना मुरबाड तालुक्यातील तरुणांनी एक वेगळा आदर्श घालून दिलाय. सह्याद्री एडवेंचर ग्रुपच्या सदस्यांनी स्विझर्लंडच्या पर्यटकाला मराठी घोषणा शिकवल्यात.

स्विझर्लंडच्या पर्यटकाला मराठी घोषणा शिकवणाऱ्या तरुणांचे कौतुक होत आ-हे. नाणेघाटातील प्रसिद्ध जीवधन ते वानरलिंगी व्हॅली क्रॉसिंग करण्यासाठी हा तरुण स्वित्झर्लंडवरून आला होता. व्हॅली क्रॉसिंग करताना सह्याद्री एडवेंचर ग्रुपच्या सदस्यांनी त्याला जय शिवराय आणि जय महाराष्ट्राच्या घोषणा शिकवल्या.. व्हॅली क्रॉसिंगचा थरार अनुभवताना या पर्यटकानंही या घोषणा देत सर्वांची मनं जिंकली.

### परदेशी पर्यटकाला शिव्या शिकवणाना तरुणांना दणका

दरम्यान, परदेशी पर्यटका शिव्या शिकवणा-या टवाळखोर तरुणांवर गुन्हा दाखल करण्यात आलाय. पुणे ग्रामीण पोलिसांकडून या टवाळखोरांचा शोध सुरु आहे. कॅनडामधून आलेल्या एका पर्यटकाला सिंहगड किल्ल्यावर हे तरुण भेटले. त्यांनी या परदेशी पर्यटकाला शिव्या द्यायला शिकवलं. शिवीगाळ करताना आपण काहीतरी चुकीचं बोलत आहोत असं या पर्यटकाला वाटलं आणि तो तिथून निघून गेला. या प्रकरणाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायर झाला आहे. त्यानंतर याप्रकरणाविरोधात संतापाची लाट पसरली. याची दखल घेत पुणे ग्रामीण पोलिसांनी टवाळखोर तरुणांवर गुन्हा दाखल केलाय.





### न्यूझीलंडच्या पर्यटकासोबत धक्कादायक प्रकार

छत्रपती शिवाजी महाराज यांचे शौर्य आणि पराक्रम सातासमुद्र पार पोहचले आहे. त्यामुळे महाराजांच्या मावळ्यांनी लढवलेले किल्ले पाहण्यासाठी परदेशातून नागरिक येत आसतात. परंतु मराठी भाषिक किंवा भारतातली इतर भाषा येत नसलेल्या पर्यटकांना आपल्या महाराष्ट्रातील काही तरुण शिविगाळ कारायला लावत असल्याचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हयरल होतोय. महाराष्ट्राच्या अस्मितेवर कलंक लावण्याचं काम काही टवाळ तरुण करताना दिसतायत. न्यूझीलंड देशातून आलेला पर्यटक सिंहगड किल्ला सर करत होता. त्यावेळी त्याला काही महाराष्ट्रातील तरुण भेटले. याप्रसंगी आपण कुठून आलो आहेत, कसे आलो आहोत? हा मूळ परिचय सोडून त्या तरुणांनी विदेशी पर्यटकाला अश्लील भाषेत शिविगाळ करणयास सांगितलं. त्यांच्या सांगण्यावरून पर्यटकाने शिविगाळ केली. मात्र शिवीगाळ करत असताना आपण काहीतरी चुकीचं बोलत असल्याचं पर्यटकाला वाटलं. कारण विदेशी पर्यटक बोलत असताना तरुणांमध्ये हास्याचा लोट पसरला होता. अतिथी देवभव आपली ही महाराष्ट्रची संस्कृती सांगते पण महाराष्ट्रातील तरुणांनी पर्यटकाला महाराजांचा अनुभव सांगण्याऐवजी शिवीगाळ करण्यास भाग पाडले. अशी खंत त्या पर्यटकाच्या मनात उद्भवली. त्यामुळे 'येथे पुन्हा येणार नाही' असा त्या पर्यटकाने त्याचा व्हिडिओमध्ये उल्लेख केलाय. महाराजांचे किल्ले सर करण्यासाठी इतर देशातून येणाऱ्या पर्यटकांसो बरोबर हीन दजार्ची वागणूक काही माती फिरू तरुण करताना पाहायला मिळत आहे. यामुळे महाराष्ट्राची अस्मिता, संस्कृती याला डाग लागतोय. विदेशी पर्यटकासोबत गैरवर्तन केल्याचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियात मोठ्या प्रमाणात व्हायरल होतोय. यानंतर मोठ्या प्रमाणात संताप व्यक्त केला जातो. खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या कार्यकर्त्यांनी हा व्हिडीओ एक्स या सोशल मीडिया अकाऊंटवर पोस्ट केला. व्हिडीओत दिसणाऱ्या, टवाळकी करणाऱ्या तरुणांवर कारवाई होईल का? हे पाहणं आता महत्त्वाचा असणार आहे.



## संपादकीय...


संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# दिलासा आणि संधी

अमेरिकी उत्पादनांवर १२५ टक्के आयातशुल्क आकारण्याचा चीनचा निर्णय म्हणजे ट्रम्प प्रशासनाला दिलेले 'जशास तसे' उत्तर म्हणावे लागेल. चीन वगळता अन्य देशांवरील आयातशुल्कामधील वाढ ९० दिवस स्थगित करण्याच्या अमेरिकेच्या निर्णयानंतर बीजिंगकडून घेतल्या गेलेल्या निर्णयात अनपेक्षित असे काही नाही. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सुरू केलेले व्यापार युद्ध तूर्तास तरी या दोन देशांमध्येच असणार असे दिसते; मात्र त्याचे परिणाम केवळ त्यांच्यापुरताच नसणार. आजच्या जागतिकीकरणाच्या काळात परस्परांवरील अवलंबित्व कमालीचे वाढलेले असल्याने दोन मोठ्या अर्थव्यवस्थांमधील संघर्षाचे फटके इतरांना बसणार यात शंका नाही. मात्र, अन्य देशांवरील आयातशुल्काला स्थगिती मिळाल्याने आणि त्यानंतर युरोपीय महासंघानेही अमेरिकी उत्पादनांवरील शुल्कवाढ रोखल्याने व्यापार युद्धाचा मोठा भडका तूर्त तरी उडणार नाही, हे स्पष्ट दिसते. यामुळे भारताला दिलासा तर मिळाला आहेच; परंतु त्याचबरोबर संधीही मिळाली आहे. ही संधी आहे, पयार्यी धोरण निश्चितीसाठीची आणि भारत-अमेरिका व्यापार कराराच्या गतिमान कार्यवाहीची. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फेब्रुवारीत केलेल्या अमेरिका दौऱ्यात या करारावर चर्चा झाली होती. तिला गती देण्यासाठी भारत प्रयत्नशील असल्याचे परराष्ट्र खात्याच्या मंत्रालयाच्या प्रवक्त्याच्या वक्तव्यावरून स्पष्ट होते. त्याचबरोबर ट्रम्प यांचे बेभरवशाचे वर्तन पाहता आणि त्यांचा आयातशुल्काचा पवित्रा नंतर कायम राहिला तर नेमके काय करता येईल, तसेच चीनकडून केल्या जात असलेल्या आवाहनाला कसा प्रतिसाद द्यायचा याबाबतही भारताला आता तरी वेळ मिळाला आहे. दुसऱ्यांदा सत्तेवर आल्यापासून ट्रम्प आयातशुल्क वाढविण्याची भाषा आक्रमकपणे करीत होते. ही उक्ती त्यांनी कृतीतही आणली; परंतु आपला निर्णय मागे घेण्याची वेळ त्यांच्यावर लगेचच आली. एकप्रकारे ही त्यांच्यावर ओढवलेली नामुष्कीच ठरली. 'जशास तसे' आयातशुल्क आकारण्याची भाषा ट्रम्प यांच्या आक्रमक राष्ट्रवादाला शोभणारी अशीच असली, तरी प्रत्यक्षात त्याचे फटके अमेरिकेलाच बसण्याची शक्यता अधिक होती. हा निर्णय प्रत्यक्षात आला असता, तर सर्व संबंधित देशांकडून आयात होणाऱ्या उत्पादनांच्या किमती अमेरिकेत वाढल्या असत्या आणि परिणामी महागाई वाढली असती. शिवाय संबंधित देशांकडून अमेरिकी उत्पादनांवरील शुल्कही वाढविले जाणार होते. काही युरोपीय देशांत तर अमेरिकी उत्पादनांवर बंदी घालण्याची मोहीमही सुरू झाली होती. ट्रम्प यांच्या या निर्णयामुळे व्यापार युद्धाचा भडका उडून त्यात अनेक देश होरपळले असते. जागतिक मंदीची शक्यताही वर्तविली जात होती. त्यामुळेच ट्रम्प यांच्या शुल्कवाढीच्या निर्णयानंतर अमेरिकेसह जगभरातील बाजार कोसळले. परिस्थिती आणखी बिघडू नये यासाठी खुद्द ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षातील जाणकार आणि अमेरिकी उद्योगपती दबाव आणत होते. मात्र, आपण धोरण बदलणार नाही, असा हेका ट्रम्प यांनी धरला होता. त्यानंतर ट्रम्प प्रशासनातील अर्थमंत्री स्कॉट बेसेंट यांनी परिस्थितीचे गांभीर्य आणि चिंता अधोरेखित केली. त्यावर मात्र ट्रम्प नरमले आणि तीन महिन्यांसाठी आयातशुल्कातील वाढीला स्थगिती जाहीर केली. परिस्थितीला शरण जात त्यांनी हा निर्णय घेतला; यामागे त्यांचे कोणतेही धोरण नव्हते, असे दिसते. नव्वद दिवसांनंतरही अशीच स्थिती राहणार असेल, तर ते शुल्कवाढीचा निर्णय पुन्हा घेतील का, याबद्दल साशंकता आहे. आपण माघार घेतली नसून, इतर देश आपल्याशी कशा प्रकारे वाटाघाटी करीत आहेत, असा पवित्रा ट्रम्प कदाचित त्यावेळी घेतील, असे दिसते. ट्रम्प यांच्या स्थगितीच्या निर्णयानंतर अमेरिकेतील भांडवली बाजार केवळ सावरलेच नाहीत, तर उसळी मारू लागले. बाजार कोसळणे आणि नंतर उसळी मारणे यातून हितसंबंधीयांचा लाभ झालेला असू शकतो. तो होऊ देणे ही ट्रम्प यांच्या निर्णयांमागील खेळी होती काय, असा प्रश्न लोकप्रतिनिधी विचारत आहे. ट्रम्प प्रशासनाने शुल्कवाढीला दिलेली स्थगिती भारतासाठी दिलासादायक आहे. यामुळे मोदी सरकारला याबाबत सुस्पष्ट नीती आखण्यासाठी वेळ मिळाला आहे. भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार कराराच्या अंमलबजावणीच्या दिशेने वेगाने पावले पडतील, हे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांचे विधान भारताची भूमिका स्पष्ट करणारे आहे. दोन्ही देशांमधील व्यापारी आणि आर्थिक नाते आणखी दृढ होतील, हा त्यांनी दाखविलेला आशावाद चुकीचा नाही. अमेरिकेबरोबरील संबंध सुदृढ करतानाच अन्य देशांबरोबरील व्यापार वाढविण्यासह अन्य देशांना भारताकडे आकर्षित करण्यासाठी धोरण आखणे; तसेच इतर पयार्यांचाही विचार व्हायला हवा. ट्रम्प यांचा बेभरवशीपणा पाहता तो आवश्यक आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विकसित भारतासाठी जलनियोजन

**महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत बुद्ध या या दोघांनाही पाण्याच्या अधिकारासाठी संघर्ष करावा लागला. रोहिणी नदीच्या पाणीवाटपावरून शाक्य आणि कोलियांच्या रक्तरंजित युद्धाला सिद्धार्थ गौतमाने रोखून धरले. ही तत्कालीन सामाजिक क्रांतीची सुरुवात होती. तर बाबासाहेबांच्या संघर्षाची सुरुवात चवदार तळ्याच्या सत्याग्रहापासून होते. पाणी हे सार्वकालिक जीवन असल्याने त्याचे महत्व या दोघांनाही होते. बुद्ध आणि बाबासाहेब या दोघांच्या जीवनाला पुढे क्रांती आणि उजेर्चा प्रवाह देण्यात 'पाणी' हा घटक समान होता.**



भारताच्या जलनियोजन नीतीमध्ये डॉ. आंबेडकरांचे योगदान मोलाचे आहे. जल व्यवस्थापन आणि धोरणाविषयी बाबासाहेब कमालीचे सजग आणि आग्रही होतेच. सामाजिक आणि आर्थिक सुधारणांचा पाया पाण्याचे योग्य वाटप वितरण, जलसंधारण, सिंचन असल्याचा त्यांचा दृष्टिकोन होता. शेती, विकास, उद्योग, जीवन, आरोग्यासाठी पाणी अत्यंत प्राथमिक गरज असल्याने त्याविषयी बाबासाहेबांना कमालीचे गंभीर होते.

कृषीप्रधान भारतात पाण्याची उपलब्धता इथल्या जगण्यासाठी महत्वाची आहे. प्रत्येक थेंबाचा योग्य सदुपयोग व्हायला हवा, म्हणून त्यांनी शेतकरी आणि शेतीविकासात पाण्याच्या नियोजनाला महत्व दिले. कालवे, धरणांची उभारणी, सिंचन प्रकल्पांवर बाबासाहेबांनी जोर दिला. शेती आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक आणि इतर बहुतेक समस्यांचे उत्तर पाण्याच्या नियोजनात असल्याचे त्यांनी ओळखले होते. पाण्याचे वाटप हे सामाजिक न्यायाच्या सिद्धांतानुसार व्हायला हवे, असा त्यांचा आग्रह होताच.

भारतीय समाज व्यवस्थेत उच्चवर्णीय आणि श्रीमंत शेतकरी, जमिनदारांकडून पाण्याचा मोठा वाटा हिरावला जात होता. त्यामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांची पिके पाण्यावाचून जळून जात होती, त्यांच्या शेतीला पाणी मिळत नसल्याने गरीब अल्पभूधारक शेतकऱ्याची स्थिती दयनीय होती. शोषित, पीडितांना सार्वजनिक पाणवठ्यावर पाण्याला स्पर्श करण्याचा अधिकारही नसल्याने शेती, जेवण तसेच इतर गरजांसाठी पाणी मिळवण्याचा प्रश्न त्यांच्यासाठी खूप पुढचा होता.

केवळ पिण्याचे किरकोळ पाणी मिळावे म्हणून कायदा करण्याची येथील गरज ही इथला माणूस, हा माणूसपणापासून किती दूर होता, याचे वाईट उदाहरण ठरावे. बाबासाहेबांनी पाणी वाटपात कायदा आणि प्रशासकीय धोरणाची गरज मांडली. डॉ. आंबेडकर जल, वीज, सिंचन मंत्रीपदी असताना त्यांनी जलनियोजनात केलेली धोरणात्मक कामे आजही पाणीवितरणाच्या मुद्यावर मार्गदर्शक ठरणारी आहेत.

बाबासाहेबांनी महाराष्ट्रातील मूल नदी खोरे प्रकल्पाची संकल्पना मांडली. हा प्रकल्प शेती, सिंचन आणि पिण्याच्या पाण्याची टंचाई कमी करण्यासाठी होता, या प्रकल्पातून महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागांसाठी पाणीपुरवठ्याच्या अनेक योजनांची आखणी केली गेली होती, जी आजही मार्गदर्शक ठरत आली आहे.

निसर्ग जीवनातील सर्व जीवांसाठी पाण्याचे महत्व किती आहे, हे पाण्यासाठी संघर्ष केलेल्या बाबासाहेबांइतके कोण जाणू शकत होते? परंतु बाबासाहेब कायद्याचे, आर्थिक, मानववंशशास्त्र आणि सामाजिक शास्त्रांचे अभ्यासक होते. जल अभियांत्रिकी, बांधकाम अभियांत्रिकी हे त्यांच्या अभ्यासाचे विषय नसल्यामुळे धरण, इमारत बांधणी, वीज निर्मिती क्षेत्रात काम करणाऱ्या देशातल्या नावाजलेल्या अभियंत्यांची त्यांनी भेट घेतली.

जगातील नावाजलेल्या लायब्ररीतून त्या त्या विषयाचे अभ्यास, संदर्भ ग्रंथ मागावून अभ्यासले, या क्षेत्रातील अभियांत्रिकी संकल्पना बाबासाहेबांनी समजून घेतल्या, जगभरातल्या नावाजलेल्या विद्यापीठातील ग्रंथालयांशी त्यांचे नाते होतेच, ही ओळख अशी कामी आली. पाण्याचा प्रश्न हा एकाच वेळी, सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि धार्मिक तसेच येथील पायाभूत विकास आणि उर्जा, तंत्रज्ञानावरही परिणाम करणारा असल्याचे त्यांना माहीत होते. सामाजिक न्याय आणि पायाभूत विकासात वीज आणि पाणी या दोन घटकांचे महत्व त्यांनी ओळखले होते.

वीज, पाणी आणि कामगार, शेतकरी हे सर्वच घटक त्यांच्या मंत्रीपदाच्या काळात तसेच्या त्यांच्या खात्यांशी, चळवळीशी संबंधित असल्याने बाबासाहेबांना याविषयी कमालीची आत्मियता होती. पाण्याचे समान वाटप होताना शेतकरी कामगारांच्या सहकारी चळवळीला त्यांनी बळ दिले. जलनीती हे सामाजिक परिवर्तनाचे साधन असल्याचा विश्वास डॉ. आंबेडकरांना होता.

सध्या चर्चिल्या जात असलेल्या राष्ट्रीय नदीजोड प्रकल्पाची कल्पना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९४२ ते १९४५ दरम्यान मांडली आणि संविधानात त्यासाठी तरतूदही केली. जलसंपत्तीचा प्रवाह असलेल्या भारतातल्या नद्यांची नैसर्गिक जपवणूक आणि स्वच्छता महत्वाची असून कुठल्याही विकासासाठी नद्यांचा बळी दिला जाऊ नये, असा त्यांचा विचार होता. वारंवार येणाऱ्या अतीवृष्टी आणि पुरामुळे गावे, शहरांचेही नुकसान होत असताना महापुराच्या अतिरिक्त पाण्याचा विनियोग करण्यावर त्यांनी भर दिला.

देशातील दामोदर खोरे प्रकल्प, हिराकुंड धरण, सोननदी प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी बाबासाहेबांचे योगदान मोलाचे आहे. जगातील नैसर्गिक जलस्त्रोत विकासाच्या नावाखाली आटवले, संकुचित केले जात असताना जगात जर तिसरे महायुद्ध झाले तर ते पाण्याच्या मागणीसाठी होईल, हे त्यांनी त्यावेळीच जाणले असावे.

वर्ष १९४२ रोजी डॉ. आंबेडकरांनी कामगार मंत्री म्हणून सूत्रे हाती घेतली होती. त्यांच्याकडे श्रम, सिंचन आणि वीज ही पायाभूत विकासातील महत्वाची खाती सोपवण्यात आली. दुसऱ्या महायुद्धानंतर संपूर्ण जगात सिंचन, वीज आणि आर्थिक विकासाचे वारे वाहू लागले होते. यावर दूरगामी धोरण ठरवण्याचे काम बाबासाहेबांकडे आले.

श्रम, सिंचन, वीज प्रकल्पांसाठी दोन राज्यात वाहणाऱ्या नद्यांच्या पाण्याचे वाटप त्यातून निर्माण होणारी वीज आणि आर्थिक सुबत्ता याचे योग्य प्रमाणात वाटप, जलविद्युत प्रकल्पांतून होर्णाया उर्जा आणि विकासाच्या लाभांची वाटणी ठरवण्याच्या अधिकाराचा त्यात समावेश होता. सोबतच राष्ट्रीय सिंचन धोरण ठरवण्यातही बाबासाहेबांचे योगदान होतेच.

राज्यघटना निर्मितीच्या कामात डॉ. आंबेडकरांनी 'पाणी' या विषयाशी संबंधित असलेल्या सर्वच खाती, घटकांना केंद्राच्या अखत्यारित असण्याचा आग्रह केला. परिणामी 'पाणी' या विषय राज्यघटनेच्या क्रमांक ५६ मध्ये अंतर्भूत होऊन केंद्राला याविषयी कायदे करण्याचे अधिकार मिळाले. नदी आणि धरणांच्या पाणीवाटपावरून राज्या-राज्यांमध्ये असलेली भांडणे सोडवण्यासाठी याच तरतुदीतून आंतरराज्यीय जलविवाद कायदा, नदीखोरे प्राधिकरण कायदा १९५६ मंजूर करण्यात आला.

पुराचे पाणी म्हणजे 'संकट' ही संकल्पना बाबासाहेबांना 'संधी' अशी बदलून घ्यायची होती. त्यासाठी त्यांनी कटक येथे झालेल्या पाणी परिषदेत मोलाचे मार्गदर्शन केले, अतिवृष्टीचे क्षेत्र अभ्यासून आणि जलनियोजनाच्या बांधणीतून पुराच्या पाण्याचा विनियोग करता येईल, या संकटाच्या पाण्याला ऊर्जा आणि विकासाच्या संधीत बदलण्याविषयी त्यांनी विचार मांडले. भारतात पाण्याच्या टंचाईमुळे शेतकरी कामगार आणि गोरगरीबांना ज्या प्रमाणात कष्ट सोसावे लागतात, त्या तुलनेत पाण्याच्या उपलब्धतेमुळे तेवढे कष्ट पडत नाहीत, अशी भूमिका त्यांनी मांडली.

आजही, 'ओला दुष्काळ परवडला पण, कोरडा दुष्काळ नको' अशीच मांडणी शेतकऱ्यांकडून केली जाते. भारताच्या भौगोलिक रचनेमुळे पर्जन्यमानासारखे नाही. नदी जोड किंवा शाश्वत जलधोरणाच्या उभारणीतून थेंब-थेंब पाण्याचा योग्य ठिकाणी गरजेनुसार विनियोग झाल्यास सर्वच घटकांच्या विकासासाठी समान संधी उपलब्ध होईल, असा त्यांचा विश्वास होता. धरणे, बंधारे, कालव्यातून पाणी अडवून जिरवून शेती, अल्पभूधारकांच्या पशूधनासाठी या पाण्याचा उपयोग होईल, पुरातून वाहून जाणारे पाणी अडवण्यासाठी बंधारे, धरणे गरजेची आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

केंद्रीय जलमार्ग, पाटबंधारे, नौकायन आयोगाचे तत्कालीन अध्यक्ष ए. एन. खोसला यांनी महानदीवरील बहुदेशीय विकास प्रस्तावावर डॉ. आंबेडकरांशी चर्चा करुन हिराकुंड धरण प्रकल्पाची अंमलबजावणी केली होती. या शिवाय बाबासाहेबांच्या अध्यक्षतेखाली 'नदी विकास खोरे' प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली, तर नदी जोड प्रकल्पही डॉ. आंबेडकरांचीच देण आहे, भारत देश नद्यांबाबत सुदैवी आहे.

परंतु पुरेशा नियोजनाअभावी देशातील नद्यांचे पुरेसे पाणी अडवले जात नाही, तर ते समुद्रात वाहून जाते, या नद्यांचे पाणी माणसांकडून कमालीचे प्रदूषित केले जाते, त्यातून जलचर आणि वनीकरण, तसेच निसर्ग संपदेलाही धोका पोहचतो, त्यामुळे बाबासाहेबांच्या जलधोरणाची गरज आजही तेवढीच महत्वाची आहे. एका ठिकाणी अतिवृष्टीमुळे हानी होते, दुर्सया भागात कोरडा दुष्काळ, जादा पाऊस असलेल्या ठिकाणाचे पाणी धरणातून अडवून ते कमी पर्जन्यमान असलेल्या ठिकाणी प्रवाहीत करण्याची संकल्पना आणि उद्देश डॉ. आंबेडकरांनी मांडली.

नदीजोड प्रकल्पाचा पाया हीच संकल्पना आहे. अस्पृश्यतेमुळे पाण्याच्या मडक्यालाही स्पर्श करण्याचा अधिकार बाबासाहेबांना नव्हता, मात्र हेच पाणी शाश्वत ऊर्जा-विकासात रुपांतरित करून हे 'जीवन' इथल्या नागरिकांसाठी बाबासाहेब आंबेडकर यांनी कायमचे खुले केले.

# बहुस्तरीय क्रांती आणि बीजारोपण

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनकार्यात क्रांती ही संकल्पना वेगवेगळया अर्थाने वापरली. त्यांनी केवळ सामाजिक क्रांती केली नाही, तर अनेक क्रांत्यांचे बीजारोपण केले. त्यांची क्रांतीची संकल्पना बहुस्तरीय होती. 'वर्चस्वाचा अंत' हे त्यांच्या क्रांती संकल्पनेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सातत्याने वर्चस्वाच्या विरोधात लढा देत होते. वर्चस्वाचा अंत करून समतेवर आधारलेला समाज व समतेचा सार्वजनिक व्यवहार करणारी शासन व्यवस्था त्यांना प्रस्थापित करावयाची होती. यामुळे डॉ. आंबेडकरांनी समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, प्रतिष्ठा इत्यादी संकल्पना 'साध्य' या अर्थाने उपयोगात आणल्या होत्या. यामुळे डॉ. आंबेडकरांनी वापरलेल्या संकल्पनांचे अर्थ संदर्भासह आणि वर्चस्वाच्या विरोधात लढण्याच्या संदर्भात घ्यावे लागतात. डॉ. आंबेडकर 'क्रांती' ही संकल्पना वापरतात. परंतु त्यांच्या एकूण लेखनामध्ये 'क्रांती' या संकल्पनेचा अर्थ संदर्भानुसार बदलत जातो. उदाहरणार्थ, 'सामाजिक क्रांती', 'बौद्ध क्रांती', 'सम्राट अशोकाच्या पाठिंब्याने घडलेली क्रांती', 'क्रांती आणि प्रतिक्रांती' अशी कितीतरी उदाहरणे नोंदवता येतात. परंतु त्यांचा मुख्य उद्देश वर्चस्वाचा अंत करणे हा होता. या अथार्ला अनुसरून त्यांची क्रांतीची संकल्पना आजच्या काळात समजून घेतली पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शोषितांसाठी 'सामाजिक क्रांती' केली, ही वस्तुस्थिती आहे. परंतु त्यांनी केवळ सामाजिक क्रांती केली नाही. त्यांनी अनेक क्रांत्यांचे बीजारोपण केले. अनेक क्रांत्या करणारे असे ते अद्वितीय व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या क्रांतिकायार्ची सुरुवात 'मूकनायक'पासून झाली. 'मूकनायक' ही संकल्पना क्रांतीचा आशय व्यक्त करणारी आहे. त्यांनी केवळ तत्काळ परिवर्तन साधले नाही, तर अनेक दूरगामी क्रांतिकारी परिवर्तने साधण्याचा विचार सातत्याने विकसित केला. प्रत्यक्ष आणि अदृश्य क्रांत्यांच्या प्रक्रियेलाही त्यांनी सुरुवात केली, ज्या आजही समाजात सुरू आहेत. त्यावर समाजात चर्चा होत असते. पारंपरिक समाजरचनेविरुद्ध त्यांनी जो लढा दिला तो केवळ सामाजिक स्तरावरचा नव्हता; तर बौद्धिक, आर्थिक, धार्मिक आणि राजकीय स्तरावरही होता. त्यामुळे बौद्धिक क्रांती, आर्थिक क्रांती, धम्म क्रांती, घटनात्मक क्रांती, बंधुता क्रांती, आत्मसन्मानाची क्रांती इत्यादी संकल्पना सहजासहजी विकसित झालेल्या दिसतात. त्यांच्या क्रांतीच्या संकल्पनेला फुलाचे रूपक वापरले तर फुलाची प्रत्येक पाकळी म्हणजे एक स्वतंत्र क्रांती ठरते. ज्याप्रमाणे एकाच फुलाला अनेक पाकळ्या असतात, त्याप्रमाणे डॉ. आंबेडकरांच्या क्रांतीच्या संकल्पनेला अनेक उपक्रांतीच्या आयडिया असल्याचे दिसते. ऐतिहासिक क्रांत्यांचे त्यांनी वर्गीकरण केले. त्यांच्या वर्गीकरणानुसार 'क्रांती आणि प्रतिक्रांती' असा त्यांनी क्रांती संकल्पनेत सूक्ष्म फरक केला. डॉ. आंबेडकर क्रांतीची संकल्पना निश्चित अथार्ने वापरत होते. त्यांनी क्रांतीची संकल्पना ढोबळ अथार्ने कधीही वापरली नाही.

**बहुस्तरीय क्रांती**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एकाच जीवनात अनेक क्रांत्या केल्या. अनेक अदृश्य क्रांत्यांची प्रक्रिया सुरू केली. हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे खास वैशिष्ट्य होते. समाज हा पारंपरिक असतो. समाजाची रचना, कार्यपद्धती आणि हितसंबंध सातत्याने रूढीवादी भूमिका घेतात. याउलट डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजामध्ये क्रांती घडवून आणली. परंतु केवळ क्रांती केली एवढ्याने त्यांच्या जीवन कार्याचे वर्णन पूर्ण होत नाही. कारण त्यांनी केवळ एक क्रांती केली नाही, तर एकाच वेळी अनेक क्रांत्या केल्या. तसेच त्यांनी अनेक अदृश्य क्रांत्यांच्या प्रक्रिया घडविल्या (बंधुत्वाची क्रांती, प्रतिष्ठेची क्रांती). ती प्रक्रिया आजही सुरू आहे. एवढेच नव्हे, तर त्यांनी अनेक क्रांत्यांचे बीजारोपण केले. उदाहरणार्थ ओबीसी क्रांती व महिलांच्या राजकीय सहभागाच्या क्रांतीचे बीजारोपण केले.

डॉ. आंबेडकरांनी अशा बहुस्तरीय क्रांत्यांचा सांधा एकत्रित जोडला. त्यांची क्रांतीची संकल्पना बहुस्तरीय होती. ही बहुस्तरीय क्रांतीची संकल्पना त्यांचे गुरू गौतम बुद्ध, महात्मा फुले यांच्या विचारात व कार्यात सुस्पष्टपणे दिसते. म. फुलेंनी उपेक्षित समाजासाठी शैक्षणिक आणि सामाजिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली, तर बुद्धांनी करुणा, समता व विचारस्वातंत्र्य यांच्या माध्यमातून समाजप्रवाह बदलण्याचा प्रयत्न केला. या दोघांच्या विचारांची सांगड डॉ.



आंबेडकरांनी घातली आणि त्या विचारांचा आधुनिक संदर्भात विकास केला. अशी काही उदाहरणे सुस्पष्टपणे सांगता येतात.

- डॉ. आंबेडकरांनी गौतम बुद्धांना आपले गुरू मानले. गौतम बुद्धांनी देखील एकाच वेळी अनेक प्रकारच्या क्रांत्या घडविल्या होत्या. अदृश्य क्रांत्यांची प्रक्रिया त्यांनी सुरू केली होती. तसेच पुढे सातत्याने काही क्रांत्यांची प्रक्रिया त्यांच्या विचारांना धरून सुरू राहिली. उदाहरणार्थ, डॉ. आंबेडकरांनी बुद्धाच्या विचारातून धम्म क्रांतीची संकल्पना विकसित केली. तसेच समाजातील वर्चस्वाच्या विरोधात लढा देण्यासाठी या संकल्पनेला जास्त टोकदार केले. बहुस्तरीय क्रांती, अदृश्य क्रांत्यांची प्रक्रिया आणि पुढील काळात क्रांतीची प्रक्रिया घडत राहणे हा एक प्रवाह डॉ. आंबेडकरांनी अधोरेखित केला.
- सम्राट अशोकाच्या पाठिंब्याने एक लहानशी क्रांती घडली होती, असाही विचार डॉ. आंबेडकरांनी मांडला. परंतु 'प्रतिक्रांती' त्यानंतर घडली. सम्राट अशोकाचा पाठिंबा असतानाही क्रांती यशस्वी झाली नाही. हा इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा त्यांनी नोंदवला आहे.
- अशीच बहुस्तरीय क्रांतीची विचारसरणी महात्मा फुले यांची देखील होती. समाजातील उपेक्षित समूहांना प्रशासनाचा अंगभूत घटक होता यावे, यासाठीचा पाया फुले यांनी घातला. त्यांच्या विचारसरणीतही एकाच वेळी अनेक क्रांत्यांची सुरुवात झाली होती. म्हणूनच त्यांना डॉ. आंबेडकरांनीही आपला गुरू मानले. डॉ. आंबेडकरांनी गौतम बुद्ध, सम्राट अशोक, महात्मा फुले यांच्या जीवन आणि कार्यातील क्रांतीच्या ऐतिहासिक संकल्पना समजून घेतल्या. आपल्या सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यात या संकल्पनांना डॉ. आंबेडकरांनी महत्त्वाचे स्थान दिले. तसेच वर्चस्व विरोधी लढ्यामधले 'क्रांती' या संकल्पनेचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

बाबासाहेबांच्या क्रांतीचा गाभा म्हणजे जातीय विषमतेचा अंत घडवून समतेचा पुरस्कार करणे, पितृसत्तेचा ऱ्हास घडवून लिंगभाव समता प्रस्थापित करणे. या अशा अनेक अदृश्य क्रांतींची प्रक्रिया जी बाह्य स्वरूपात दिसत नाही, पण समाजमनात खोलवर चालू असते, ती प्रक्रिया आंबेडकरांनी सुरू केली, जोपासली. पुढच्या पिढ्यांना यातूनच प्रेरणा मिळालेली आहे.

प्रौढ मतदानाची क्रांती

बाबासाहेबांनी सर्वसामान्यांना प्रौढ मतदानाचा अधिकार देऊन एक अदृश्य क्रांती भारतात घडवली आहे. हा मुद्दा विविध संदर्भांसह लक्षात घेतला तर या क्रांतीची तीव्रता समजते.

दारिद्र्य, निरक्षरता, सामाजिक श्रेष्ठ-कनिष्ठता आणि हजारो वर्षांच्या विषमतावादी व शोषणात्मक परंपरा असलेल्या भारतीय समाजात त्यांनी सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराची प्रस्थापना केली. ही एक घटनात्मक क्रांती होती. एकाच वेळी सार्वत्रिक पातळीवर मतदानाचा अधिकार इतर देशांमध्ये दिला गेला नव्हता. भारतामध्ये मात्र ही प्रक्रिया डॉ. आंबेडकरांनी घडवली.

वर्णवर्चस्ववादी समाजात फक्त काही लोकांकडेच सुज्ञपणे मतदान करण्याची राजकीय जाणीव आहे, असे मानले जात होते. ही श्रेष्ठत्वाची भ्रामक जाणीव होती. श्रेष्ठत्वाच्या या भ्रामक जाणिवेवर मात करून सर्वसामान्य भारतीय लोकही सुज्ञपणे मतदान करू शकतात, या जाणिवेचे बीजारोपण डॉ. आंबेडकरांनी केले. लोकशाही प्रक्रियेबद्दलच्या सर्व उच्चभ्रू समजुतींना नाकारले आणि एक अदृश्य क्रांती घडवून आणली.

निवडणूक पद्धतीची लोकशाही ही तळागाळात व्यापक बदलाची प्रतिनिधी बनली, तर पंचायतींमध्ये महिला आणि उपेक्षित गटांसाठी राखीव जागा राखीव ठेवल्याने त्यांना स्वतःचे भविष्य घडविण्याची शक्ती मिळाली.

प्रौढ भारतीयांना मतदार बनविणे हे भारताचे वसाहतवादमुक्तीचे मोठे पाऊल होते. कारण हा वसाहतवादी राजवटीचा वारसा नव्हता, तर भारतीयांनी स्वतः स्वतःसाठी सार्वत्रिक मताधिकाराची कल्पना स्वीकारली, या काल्पनिकतेवर कृती केली आणि ती राजकीय वास्तवात उतरवली. ही एक क्रांती का होती? कारण सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराचा स्वीकार हा वसाहतवादी पद्धतीपासून स्वतंत्र झाल्याचा एक महत्त्वाचा टप्पा होता. स्वातंत्र्यापूर्वीही ब्रिटिश वसाहतीच्या काळात निवडणूक संस्था अस्तित्वात होती. परंतु त्याकाळी निवडणुका या प्रामुख्याने सत्ताधारी वगार्ला सहकार्य करण्याचे आणि वसाहती राज्याला बळकटी देण्याचे साधन होत्या. या निवडणुकांमध्ये प्रतिनिधित्व स्वतंत्र मतदारांवर आधारित होते असले, तरी धार्मिक समुदाय आणि व्यावसायिक निकषावर आणि मर्यादित मताधिकारावर (सार्वत्रिक मताधिकार नव्हे) जागा वाटल्या जात होत्या. मतदारांना केवळ 'व्यक्ती' म्हणून परिभाषित करण्याऐवजी, कायद्याने त्यांना 'समुदाय' आणि 'गटांचे सदस्य' म्हणून परिभाषित केले होते. अशाप्रकारे ब्रिटिशांच्या वसाहतवादी राज्यव्यस्थेत निवडणुकांचा अनुभव आणि वारसा लोकांना लोकशाही पद्धतीचे प्रतिनिधित्व देत नव्हता.

लोकशाही आणि प्रौढ मताधिकार या गोष्टी आधुनिक आहेत. लोकशाही आणि प्रौढ मताधिकार यांना गुणवत्तेचा निकष लावला गेला होता. हा निकष लोकमान्य टिळक यांनी लावला. मात्र डॉ. आंबेडकरांनी लोकशाही आणि प्रौढ मताधिकार यांना लावलेला गुणवत्तेचा निकष स्वातंत्र्यपूर्व काळामध्येच अमान्य केला. त्यांनी सामान्य व अशिक्षित व्यक्तींना देखील लोकशाहीत अधिकार दिले. तसेच प्रौढ मताधिकार दिला. याबरोबरच त्यांनी स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाहीत आणि प्रौढ मताधिकारामध्ये गुणवत्ता आली पाहिजे, असाही विचार मांडला. म्हणजेच सुरुवातीला प्रस्थापितांचे वर्चस्व दूर करण्यासाठी त्यांनी गुणवत्तेचा आग्रह नाकारला आणि लोकशाहीत सहभागाची संधी मिळाल्यानंतर प्रस्थापितांचे वर्चस्व मोडून काढण्यासाठी त्यांनी पुन्हा गुणवत्तेचा आग्रह धरला. म्हणजे थोडक्यात डॉ. आंबेडकरांना नियमापेक्षा तत्त्व महत्त्वाचे वाटत होते. कारण त्यांना वर्चस्वाचा ऱ्हास घडवून समता प्रस्थापित करणे महत्त्वाचे वाटत होते.

**आत्मसन्मान क्रांती**

डॉ. आंबेडकरांसाठी आत्मसन्मानाची क्रांती सुद्धा महत्त्वाची होती. व्यक्तीच्या आत्मसन्मानाची क्रांती म्हणजेच लोकशाही क्रांती होय, असाही एक अर्थ इथे घेता येईल. या संदभार्तील दोन तपशील महत्त्वाचे आहेत.

डॉ. आंबेडकरांनी बंधुता हे तत्त्व मांडत असतानाच आत्मसन्मानाची क्रांती घडली पाहिजे, हा विचार भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये मांडला होता.

प्रत्येक व्यक्तीला आत्मसन्मान मिळाला पाहिजे. वंश, जात, धर्म, भाषा, स्त्री-पुरुष इत्यादी घटकांच्या आधारे व्यक्तीच्या आत्मसन्मानाचा अंत घडू नये, असे विचार त्यांनी वेगवेगळ्या भाषणांमध्ये आणि लेखनामध्ये व्यक्त केले होते. प्रत्येक व्यक्तीला 'नागरिक' म्हणून मान्यता देऊन त्याबरोबरच त्या व्यक्तीला आत्मसन्मान देण्याची व्यवस्था डॉ आंबेडकरांनी निर्माण केली. तसेच त्यांनी आत्मसन्मान नाकारणाऱ्या व्यवस्थेच्या विरोधात संघर्षही केला.

डॉ. आंबेडकरांनी प्रौढ मताधिकार, आत्मसन्मान या संकल्पनांचा अर्थ 'क्रांती' या अर्थाने घेतला होता. परंतु त्यांचा क्रांतीचा विचार हा 'फ्रेंच राज्यक्रांती' किंवा 'रक्तरंजित राज्यक्रांती' असा नव्हता. फ्रेंच राज्यक्रांतीत त्यांना पितृसत्ताक व्यवस्था दिसत होती. त्यामुळे त्यांनी बुद्धाच्या विचारातील क्रांतीचा विचार स्वीकारला. हिंसक क्रांती वर्चस्वाचा अंत करत नाही. त्यामुळे हिंसक क्रांतीच्या तुलनेत त्यांनी 'धम्मक्रांती'चा पुरस्कार केला. धम्मक्रांतीमध्येही नैतिकतेची क्रांती त्यांना अपेक्षित होती. थोडक्यात 'वर्चस्वाचा अंत' हे त्यांच्या क्रांती संकल्पनेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. हे वैशिष्ट्य त्यांना गौतम बुद्ध, सम्राट अशोक, महात्मा फुले यांच्या क्रांतीच्या संकल्पनांमध्ये दिसत होते.



# ज्ञानयोगी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

*भारताच्या पावन भूमीवर अनेक महापुरुषांनी जन्म घेऊन देशासाठी व समाजासाठी अहोरात्र कार्य करुन सामाजिक बांधिलकी व राष्ट्रनिष्ठा जोपासली आहे. त्यांचा सेवेचा वारसा आजही देशवासियांसाठी आदर्श, मार्गदर्शक व दिशा दर्शक ठरलेला आहे. अशा या थोर महापुरुषात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव सर्वात वर आहे.*

*भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म वडील रामजी व माता भीमाबाई यांच्या पोटी १४ एप्रिल १८९१ रोजी झाला. बाल भीमाचे वडील रामजी आपल्या मुलांवर चांगले संस्कार व्हावेत म्हणून दक्ष असत, त्यांना स्वतः वाचनाची आवड असल्यामुळे घरात ग्रंथसंग्रह हा होताच. मुलांना ही ते चांगली पुस्तके वाचावयास आणून देत असत. म्हणून बाबासाहेबांच्या आयुष्याच्या अंतिम क्षणापावेतो वाचनाची व अभ्यासपूर्ण चिंतनाची सवय त्याच्या ठायी आढळते. तुकाराम व कबीर बाबासाहेबांच्या अभ्यासाचे विषय भावी आयुष्यात झालेले दिसतात.*

*डॉ. बाबासाहेब म्हणजे अष्टपैलू व्यक्तीमत्व होते. त्यांना प्रत्येक क्षेत्राचे परिपूर्ण ज्ञान व माहिती होती. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक धार्मिक, पत्रकारिता, कायदे अशा विविध क्षेत्रात आपल्या अमोघ वक्तृत्वाने व कुशल नेतृत्वाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दीन, दलितांच्या, श्रमिकांच्या विस्थापितांच्या, शोषितांच्या अंधकारमय जीवनाला प्रज्ञेचा संदेश दिला. गलितगात्र झालेल्या मनामनांतून समाजक्रांतीचे स्फुलींग चेतवून डॉ. आंबेडकर यांनी मुर्दाड झालेल्या समाजाला आपल्या हक्काप्रती जागृत केले.*

### डॉ. आंबेडकर म्हणजे प्रेरक, उद्धारक व तारक शक्ती होय:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर नुसते पुस्तकी पंडित नव्हते तर त्यांनी आपल्या आयुष्यात आचार आणि विचार यांची सांगड घातली आणि आपल्या तत्वज्ञानाला कृतीची जोड दिली. त्यांनी मनुष्य मात्रांच्या जीवनातील दुःख, दारिद्र्य आणि क्लेश दूर करण्यासाठी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपले पूरे ज्ञान माहिती व बळ लावले आणि रंजल्या गांजल्या जनतेच्या तसेच स्त्री वर्गाच्या शेतकरी, मजूर वर्गाच्या आणि पददलितांच्या उद्धारार्थ आपले प्राण पणाला लावून समतेची मंगलवाट दाखविते आणि मानवतेची दिव्य ज्योत निर्माण करते ती व्यक्ती केवळ वंदनीय नव्हे तर ती व्यक्ती प्रेरक, उद्धारक व तारक शक्ती ठरते.

### शैक्षणिक विचार:

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे. शिक्षणाने माणसाला आपले कर्तव्य व हक्कांची जाणीव होते. समाजातील अस्पृश्य समाजाला स्वत्वाची जाणीव व्हावी या साठी त्यांनी शिक्षणाचे महत्व समाजात विशद केले. ''शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. ते जो पिल तो माणूस गुरगुरल्या शिवाय राहणार नाही,'' असे ते समाज बांधवांना सांगत. प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे, म्हणून हे शिक्षण अतिशय दर्जेदार व गुणवत्तेचे असावे असे सांगत. ''प्राथमिक शिक्षणाचे ध्येय असे असले पाहिजे की, मुलगा किंवा मुलगी एकदा शाळेत दाखल झाले की, ते पूर्णपणे सुशिक्षित, माहितीपूर्ण व गुणवत्ता प्राप्त करुनच बाहेर पडावेत. शासनाने यासाठी लक्ष द्यायला हवे त्यांचे म्हणणे हाते की, समाजाच्या सर्व थरापर्यंत शिक्षण गेले पाहिजे. शिक्षण प्राप्त झाल्याने व्यक्ती बौद्धिक दृष्टा सशक्त होतो. व्यक्तीला चांगले आणि वाईट यातील फरक समजायला लागतो. प्रज्ञा, शील आणि करुणा हे गुण प्रत्येकाच्या अंगी आणण्यासाठी शिक्षणाची गरज त्यांनी प्रतिपादन केलेली आहे. शाळेत मुलांना केवळ बाराखडी शिकवू नये तर मुलांची मने सुसंस्कृत व गुणवत्तामय बनवावी. समाज हितार्थ या ज्ञानप्राप्त मुलांनी आपली सामाजिक बांधिलकीची कर्तव्ये योग्य व समर्थपणे पार पाडावीत असे शिक्षण असावे. शाळा म्हणजे उत्तम नागरिक व कर्तव्यदक्ष नागरिक बनविणारे कारखाने आहेत. याचे भान या प्रक्रियेत भाग घेणार्यांनी ध्यानी घ्यावे. पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापन १९४६ साली करुन त्यांनी मुंबइला सिद्धार्थ कॉलेज व औरंगाबादला मिलींद महाविद्यालय सुरू केले. राष्ट्रहीत व समाजहीताचे भान ठेवणारेच खरे शिक्षण होय असे ते मानीत.

### सामाजिक क्रांतीचे रणशिंग फुंकले:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सत्याच्या मार्गावर चालणारे खरे मार्गदर्शक होते. भ्रष्टाचार, अनीति, अत्याचार, अन्यायास त्यांचा प्रखर विरोध होता. जातीभेदाच्या ते विरोधात होते. जातीभेद म्हणजे समाजाला लागलेली किड ते मानत असत. ही सामाजिक किड नष्ट केल्याशिवाय समाज एकसंघ होणार नाही असे ते समजत. डॉ. आंबेडकर म्हणजे तळागळातील लोकांना बौद्धिक व समाजिक गुलामगिरीतून मुक्त करुन त्यांना मंत्र देणारे एक पथदर्शक होते. शिकल्याशिवाय आपल्यावरील न्याय, अन्याय, आपले हक्क ही आपल्याला कळत नाही अशा प्रकारे त्यांनी सामाजिक क्रांतीचे रणशिंग समाजात फुंकले.

### प्रखर राष्ट्रप्रेम व राष्ट्रनिष्ठा :



डॉ. बाबासाहेबांच्या आचार विचारांत राष्ट्रप्रेम व राष्ट्रनिष्ठा भरलेली होती. डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा करताच तात्कालीन राष्ट्रीय नेते मंडळी घाबरली त्यांना वाटले डॉ. आंबेडकर आता देश सोडून जाणार परंतु डॉ. आंबेडकरांनी सांगितले, ''आम्ही या भारतदेशाची संतान आहोत, आम्हाला राष्ट्रीयत्वाची जाणीव आहेच, राष्ट्रावर संकट आल्यास प्राणपणाला लावून देशाचे रक्षण केले व करु सुद्धा'' यात डॉ. आंबेडकरांची प्रखर राष्ट्रनिष्ठा समावलेली आहे.

### स्त्रियाचे शेतकरी, शेतमजूर श्रम जीवी, व दलितांचे कैवारी :

स्त्रियांना पुरुषांप्रमाणे समान हक्क मिळावेत यासाठी त्यांनी अनेक चळवळी केल्या. स्त्रियांची गुलामगिरी डॉ. आंबेडकरांनी दूर केली. १९२७ ते १९५६ पर्यंतच्या काळात बाबासाहेबांनी भारतीय स्त्रीचा सामाजिक, कायदेशीर आणि राजकीय दर्जा, वाढावा म्हणून सतत प्रयत्न केला. १९४२ साली भरलेल्या नागपूर येथील परिषदेत त्यांनी महिलांना सांगितले की, स्वच्छता पाळा, सर्व द्रुगुणांपासून दुर रहा, मुलामुलींना शिक्षण द्या त्यांना महत्वाकांक्षी बनवा, त्यांचा न्यूनगंड दूर करा असा महत्वाचा उपदेश केला. दलितांना त्यांचे हक्क मिळावे यासाठी त्यांनी त्यांच्या हक्कासाठी लढा दिला. श्रमजिवीच्या साठीही ते खंबीरपणे उभे राहिले. दलितांना मानाचे जीवन जगता यावे म्हणून ते सातत्याने संघर्ष करीत राहीले. केवळ दलितासाठीच नव्हे तर शेतकरी व मजूर यांच्या प्रश्नासंबंधी जोरदार लढा दिला.

अशा या महामानवाचे महान कार्य म्हणजे देशासाठी व समाजासाठीचे सामाजिक बांधिलकीचे कर्तव्य होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विश्वाला मिळालेली महान देणगी होय.

अशा या महामानवाने ६ डिसेंबर १९५६ साली अखेरचा श्वास घेतला आणि आपल्या कार्याचा ठसा मागे उमटवला.



## मुंबई विद्यापीठाचे अधिकृत समाज माध्यम खाती खालील प्रमाणेः

- फेसबुक : //www.facebook.com/share/16NYoF47Qr/?mibextid=wwXIfr
- इंस्टाग्राम : @uni_mumbai https://www.instagram.com/invites/contact/?igsh=1waqe9cui2ljn&utm_co»»ftent=frrdwsd
- एक्स : https://x.com/uni_mumbai?s=21&t=4_dHhl9cp9NER8yj3DA9tQ
- यूट्यूब : https://youtube.com/@universityofmumbai_uom?si=Cn8v_VbmdtbuebSF
- व्हॉट्सअप चॅनेल : https://whatsapp.com/channel/0029Vb1yiOPK0IBi6rHdBw41

# सावधान! मुंबई विद्यापीठाच्या नावाने बनावट फेसबुक पेजवरुन प्रवेशाचे आवाहन

**मुंबई :** राज्यभरातील विद्यार्थ्यांसाठी आणि मुंबईतील महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचं हक्काचं विद्यापीठ म्हणजे मुंबई विद्यापीठ. सध्या नवीन शैक्षणिक वर्षासाठी विद्यापीठात प्रवेश प्रकियेला सुरुवात झाली आहे. मात्र, याच कालावधीचा गैरफायदा घेत काही समाजकंटकांनी मुंबई विद्यापीठाच्या नावाचा गैरवापर करून एका बनावट फेसबुक पेजद्वारे ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू केली आहे. विद्यार्थ्यांची आर्थिक फसवणूक करण्याच्या उद्देशाने ही फसवणूक करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. या संदर्भात सायबर क्राइम विभागाकडे अधिकृत तक्रार दाखल करण्यात आली आहे. त्यानंत, सायबर विभागानेही विद्यार्थ्यांना फसवणुकीपासून सावधान, अलर्ट राहण्याचे आवाहन केले आहे.

मुंबई विद्यापीठाच्या नावाने सदर बनावट फेसबुक पेज https://www.facebook.com/shÔre/1ALkntvz9o/ या लिंकवर आढळून आले असून, त्यावर इच्छुक विद्यार्थ्यांना त्यांचे नाव, मोबाईल क्रमांक आणि ईमेल आयडी टाकण्यास सांगितले जाते. ही माहिती भरल्यानंतर वापरकत्यार्ला https://www.markmonitor.com/online-com/ या संशयास्पद वेबसाईटवर वळवले जाते. या प्रकारातून आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याचे आणि अधिकृत वेबसाईट व माध्यमांद्वारेच माहितीची खात्री करूनच पुढील पाऊल उचलण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

मुंबई विद्यापीठ किंवा त्याच्या वतीने कुठल्याही अशा माध्यमातून प्रवेश प्रकिया राबवली जात नाही, याची नोंद घ्यावी. नागरिकांनी अशा बनावट पेजपासून सावध राहावे आणि संशयास्पद माहिती त्वरित संबंधित यंत्रणांकडे कळविण्यात यावी, असे आवाहन मुंबई विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे. त्यामुळे, विद्यार्थ्यांनी व पालकांनी आपली आर्थिक फसवणूक होऊ न देण्यासाठी काळजी घेणं महत्त्वाचं आहे. गेल्या काही दिवसांत ऑनलाईन फसवणुकीचे प्रकार वाढले असून सायबर विभागाकडून त्यांच्यावर नियंत्रण आणण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

दरम्यान, मुंबई विद्यापीठातील प्रवेश प्रक्रियेची सविस्तर माहिती मुंबई विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेत स्थळावर उपलब्ध करून दिली जाणार आहे. तसेच, मुंबई विद्यापीठाच्या अधिकृत सोशल मीडिया हँडलची देखील माहिती खाली देण्यात आली आहे.




# 'काका लोकांना विश्वासात घ्यावं लागतं, त्याशिवाय...'
## अजित पवारांच्या वक्तव्याची महाराष्ट्राच्या राजकारणात चर्चा!

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीच्याआधी राष्ट्रवादीत फूट पडली. अनेक आमदार, खासदार अजित पवार यांच्यासोबत गेले. यानंतर पक्ष आणि चिन्ह अजित पवार यांच्याकडे राहिले. विधानसभेत राष्ट्रवादी कॉंग्रेसला यश मिळाले आणि अजित पवार पुन्हा उपमुख्यमंत्री झाले. शरद पवार यांच्यासाठी हा मोठा धक्का मानला गेला. यानंतर काका-पुतण्या यांच्या नात्याची बरीच चर्चा झाली. दरम्यान अजित पवारांनी बारामतीला असताना काकांना उद्देशून एक विधान केलंय. या विधानावरुन महाराष्ट्राच्या राजकारणात उलटसुलट चर्चा सुरु आहे.



बारामतीती एका कार्यक्रमात रस्त्यांच्या प्रश्नांबाबत बोलताना अजित पवारांनी एक मिश्किल टिप्पणी केलीय. 'रस्त्याच्या कामांबाबत काकाला विश्वासात घ्या. कारण काका लोकांना विश्वासात घ्यावं लागतं. त्याशिवाय पुढे चालत नाही', असं अजित पवारांनी म्हटलंय.

अजितदादांच्या विधानानंतर उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला होता. यानंतर बोलताना अजितदादांनी आपण काका कुतवलांबाबत बोलल्याचं म्हटलंय.नाहीतर लगेच तुम्ही म्हणाल 'दादा घसरले, दादा कोणावर घसरले नाहीत', असंही अजित पवार मिश्किलपणे म्हणालेत.

## मुंबईकरही पाणीटंचाईमुळे हैराण

मुंबईला ऊर्ध्व वैतरणा, मोडकसागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार आणि तुळशी या सात धरणांमधून दरदिवशी ३९०० दशलक्ष लिटर इतका पाणीपुरवठा केला जातो. गेल्या अनेक दिवसांपासून मुंबईतील अनेक भागांमधील नागरिक तीव्र पाणीटंचाईचा सामना करीत आहे. अशातच टँकर मालक संघटनेने संप पुकारल्यामुळे मुंबईकरांची पाण्याची वाढती मागणी पूर्ण करणे कठिण झाले आहे. दरम्यान, मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सात धरणांमधील पाणीसाठा झपाट्याने आटू लागला असून सध्या केवळ ३१ टक्के जलसाठा धरणांमध्ये शिल्लक आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा धरणांमध्ये अधिक पाणीसाठा असला तरी दिवसेंदिवस वाढत असलेली उन्हाची तीव्रता आणि जलदगतीने होणारे बाष्पीभवन महापालिकेच्या जल विभागाच्या काळजीत भर पाडत आहे. परिणामी, मुंबईकारणांवर तीव्र पाणी संकट ओढवण्याची चिन्हे दाट होऊ लागली आहेत.

# पुणे महापालिकेने नागरिकांनाच लिहिलं ऑपन लेटर

**पुणे :** पुणेकरांनो पाणी जपून वापरा... अशा आशयाचं विनंती पत्र पुणे महापालिकेने थेट नागरिकांनाच लिहीलं आहे. पाणी बचतीसाठी महापालिकेकडून नागरिकांना पत्र लिहीत विनंती केली जात आहे. राज्य शासनाकडून जल व्यवस्थापन पंधरावडा साजरा केला जाणार असून त्या अंतर्गत पालिकेकडून पाणी बचतीसाठीची जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे. याच मोहिमेअंतर्गत पुणे महानगरपालिका आता शहरातील नागरिकांना पाणी जपून वापरण्यासाठी विनंती पत्र लिहिणार आहे



शहरात गेल्या काही दिवसांपासून उन्हाचा चटका वाढल्याने पाण्याची मागणी १० ते १५ टक्के वाढली आहे. तसेच अनेक सोसायट्यांमध्ये पाण्याचा अपव्यय केला जातो. अशा स्थितीत, महापालिकेस धरणातून मिळणारे पाणी मर्यादीत असल्याने पाणी बचतीसाठी पालिकेकडून पत्र पाठवून जनजागृती केली जाणार आहे.

### काय उपाययोजना करणार?

पुण्यात अनेक सोसायट्या आहेत ज्या जुन्या झाल्या आहेत. अशा सोसायट्यांमध्ये पाणीच्या टाक्यांची मोठी गळती असते. यामुळे पाणी जमिनीत मुरते. तसेच टाक्या ओव्हरफ्लो होऊन पाणी वाया जातं. तसेच अनेक घरांमध्ये देखील लिकेज असते. या सगळ्या मुद्यांवरुन महापालिकेने नागरिकांना पत्र लिहिलं आहे.

# आमदारांची पाठ वळताच सिडकोकडून कारवाई
## प्रशांत ठाकूर म्हणाले, मी घरे बांधून देणार

**पनवेल :** सिडकोच्या पाडकाम कारवाईतून आदिवासींची घरे वाचवण्यासाठी तीन दिवसांपूर्वी आमदार प्रशांत ठाकूर यांनी भर उन्हात आंदोलन केले होते. एवढेच नाही तर आदिवासींची घरे पाडल्यास आत्मदहन करू, असा इशाराही त्यांनी दिला होता. एवढे होऊनही आमदारांची पाठ वळल्यानंतर दुसऱ्याच दिवशी सिडकोने करंजाडेमधील फणसवाडीतील आदिवासी वाड्यातील १२ घरे जमीनदोस्त केली. या कारवाईमुळे चाळीशी पार केलेल्या उन्हात संसार थाटण्याची वेळ या आदिवासींवर आली आहे. त्याचवेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आदिवासींची घरे स्वखचार्ने बांधणार असल्याचे स्पष्ट करून त्यांना मोठा दिलासा दिला आहे. एवढेच नाही तर आदिवासी वाडीजवळच भराव टाकून कामाला सुरुवात केली आहे.

सिडकोने करंजाडेजवळील वडघर ग्रामपंचायत हद्दीतील फडणवाडी आदिवासी वाडीतील घरे पाडण्याची नोटीस यापूर्वी बजावली होती. मात्र, घरे तोडल्यावर आदिवासींनी करायचे काय, हा प्रश्न होता. ८ एप्रिल रोजी घरे पाडण्यासाठी सिडकोचा फौजफाटा आदिवासी वाडीमध्ये गेला होता. मात्र, त्याचवेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी घटनास्थळी जाऊन भर उन्हात ठिय्या मांडला. एवढेच नाही तर आदिवासींची घरे पाडल्यास इथेच पेटवून घेऊन आत्मदहन करू, असा इशारा दिला. त्यानंतर त्यांना सिडको कार्यालयात चचेर्ला बोलावण्यात आले. त्यावेळी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी आदिवासींच्या घरांबाबत सिडको धोरणात्मक निर्णय घेईल आणि तोपर्यंत कोणतीही कारवाई करणार नाही, अशी ग्वाही दिली होती.




या चर्चेतच आदिवासी बांधवांच्या घरे वस्त्यांबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याचे सिडकोने मान्य केले आणि या संदर्भातील पत्र आमदार प्रशांत ठाकूर यांना देण्यात आले. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी (९ एप्रिल) सिडकोने पुन्हा लवाजमा आणून फणसवाडीतील आदिवासींची १२ घरे जमीनदोस्त केली. आधीच उन्हाचा वाढलेला कडाका त्यात बेघर झालेल्या आदिवासींनी करायचे काय, हा मोठा प्रश्न होता. मात्र, आमदार प्रशांत ठाकूर पुढे आले आणि त्यांनी स्वखर्चाने १२ घरे बांधून देणार असल्याचे स्पष्ट केले. एवढेच नाही तर या घरांसाठी बाजूलाच भरावकाम सुरू केले आहे, अशी माहिती भाजपच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी आपलं महानगरला दिली.

या आदिवासींची तात्पुरती सोय म्हणून त्यांना ३०० चौरस फुटांची घरे आमदार प्रशांत ठाकूर बांधून देत आहेत. सिडकोकडून त्यांचे कायमस्वरुपी पुनर्वसन होईपर्यंत ही आदिवासी कुटुंबे या घरांमध्ये राहतील, असे दर्शना भोईल यांनी सांगितले. सध्या त्यांची राहण्याची सोय शाळेमध्ये करण्यात आली आहे. फडणवाडीत १९८० पासून आदिवासींची ३२ घरे आहेत. पर्यायी मार्गासाठी ही घरे पाडण्यात आली आहेत.

# 'रुग्णालयांनी डिपॉझिटची मागणी करणे गैर नाही'
## पुणे पालिकेच्या आदेशाला आयएमएचा विरोध!

**पुणे :** यापुढे पुण्यातील कोणत्याही रुग्णालयाने अनामत रक्कम मागू नये, असा आदेश पुणे महानगरपालिकेने काढला. मात्र, त्याला 'इंडियन मेडिकल असोसिएशन'ने विरोध केला आहे. अनामत रकमेची मागणी करणे गैर नाही, अशी भूमिका 'आयएमए'ने घेतली आहे.

अनामत रक्कम न दिल्याने पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने गर्भवतीवर उपचार केले नाहीत. त्यामुळे प्रसूतिपश्चात तिचा मृत्यू झाला होता. या घटनेने राज्यात संतापाची लाट उसळली होती. डॉक्टरांच्या संघटनेने काढलेल्या पत्रकात असे-



ही म्हटले आहे की, धमार्दाय रुग्णलयांना सरकारदरबारी का-ही सवलती मिळतात. त्यामुळे त्यांनी अनामत रक्कम मागू नये असे सांगणे एकवेळ मान्य करता येईल; पण अनेक लहान आणि मध्यम प्रकारची रुग्णालये आणि धमार्दाय रुग्णालये यामध्ये गल्लत करू नये. सवार्ना एकाच पारड्यात तोलू नये, असे इंडियन मेडिकल असोसिएशन'ने म्हटलंय.

### ससून रुग्णालयाची समिति करणार चौकशी

तनिषा भिसे मृत्यू प्रकरणी ससून रुग्णालयाची समिती करणार प्रकरणाची चौकशी करणार आहे. दीनानाथ, सूर्या, मणिपालमधील उपचारांची चौकशी केली जाणार आहे. ससूनच्या चौकशी समितीमार्फत याचा तपास होणार असून मंगळवारपासून प्रकरणाची चौकशी सुरू होणार आहे. पुणे पोलिसांकडून ससून रुग्णालयाला याबाबतीत चौकशी करण्याचं पत्र लिहिलं होतं. त्यानंतर आता ससून रुग्णालय मंगळवारपासून ही चौकशी करणार आहेत.

# उपचार घेण्यासाठी आलेल्या अल्पवयीन मुलीवर डॉक्टरकडून अत्याचार

**नाशिक :** राज्यात मोठ्या प्रमाणात अत्याचाराच्या घटना वाढल्या आहेत. अशातच आता संगमनेर शहरातील कनिष्ठ महाविद्यालयात शिकणाऱ्या १६ वर्षीय अल्पवयीन मुलीवर उपचार करण्याच्या बहाण्याने डॉक्टरने अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. कनिष्ठ महाविद्यालयात शिकणाऱ्या १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला शुक्रवारी श्वसनाचा त्रास होऊ लागल्याने तिला डॉ. कर्पे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. यानंतर तिच्या उपचार करण्यात आले. त्यानंतर तिला रविवारी पहाटेच्या सुमारास डॉक्टरांनी मुलीच्या प्रकृतीची चौकशी केली. त्यानंतर डॉक्टर त्या मुलीला टेरेसवर घेऊन गेले. तिथे गेल्यावर डॉक्टरांनी मुलीसोबत गैरवर्तन करण्याचा प्रयत्न केला. मुलीने अनेकदा विरोध केला. मात्र, डॉक्टरांनी तिच्यावर बळजबरीने अत्याचार केले. अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून ६ एप्रिल रोजी डॉक्टर फरार झाला. या घटनेनंतर आरोपी फरार असल्याने संगमनेर शहर पोलिसांनी तात्काळ पथक पाठवून नाशिक येथून रात्री डॉक्टरला ताब्यात घेतलं आहे. घटनेची माहिती समजल्यानंतर कॉंग्रेसचे आमदार बाळासाहेब थोरात यांची मुलगी जयश्री थोरात यांनी देखील पोलीस ठाण्यात धाव घेतली. या घटनेतील आरोपीला कठोरता कठोर शिक्षा देण्यात यावी अशा मागणी त्यांनी केली. या घटनेनंतर काही वेळ हॉस्पिटल बाहेर गोंधळ देखील निर्माण झाला होता. त्यानंतर या हॉस्पिटलच्या जवळ पोलीस बंदोबस्त देखील तैनात करण्यात आला होता. या घटनेप्रकरणी संबंधित डॉक्टरवर बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा आणि भारतीय न्याय संहितेच्या इतर काही कलमाखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी संगमनेर

या घटनेमुळे संगमनेर परिसरात एकच खळबळ उडाली. यानंतर कुटुंबीयांना माहिती समजतात कुटुंबीयांनी रुग्णालयात धाव घेतली. यावेळी पोलिसांनी घटनास्थळी जावून घटनेची माहिती घेतली. डॉक्टर अमोल कर्पे याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित मुलीने दिलेल्या फियार्दीत अत्याचार केल्यानंतर डॉक्टरने याबाबत कोणालाही काही सांगितल्यास तुला जिवंत ठेवणार नाही अशी धमकी दिल्याचं देखील म्हटलं आहे.



# बलात्कार करुन तरुणीची हत्या... मृतदेह भिमानदी पात्रात फेकला

**पुणे :** पुन्हा एकदा महाराष्ट्राला हदरवणारी घटना घडली आहे. पुणे जिल्ह्यात अत्यंत भयानक घटना घडली आहे. बलात्कार करुन तरुणीची हत्या करण्यात आली. यानंतर तिचा मृतदेह भिमानदी पात्रात फेकला.

महिला अत्याचारांच्या घटनांवरुन प्रसिद्ध अभिनेत्री अलका कुबल संतापल्यात. मुलींवर अत्याचाराच्या घटना वारंवार बघत आणि वाचत असते. यात अत्याचार करणारे कुटुंबातील काही व्यक्त असल्याचं अनेक वेळा समोर आले आहे. काही घटनांमध्ये तर बापच मुलींवर बलात्कार करत असल्याचं उघड झालंय.अशा बापाचा मुलीने खून करावा असा संताप अभिनेत्री अलका कुबल यांनी जळगावमधील खान्देश करिअर महोत्सवाच्या निमित्तानं बोलताना त्यांनी संताप व्यक्त केला आहे.

आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. पुण्यातील स्वारगेट बस स्थानकातील बलात्काराच्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला होता.

मृत तरुणी राजगुरुनगर येथुन बेपत्ता झाली होती. या तरुणीवर गावातील व्यक्तीने अत्याचार करुन खुन केल्याची कबुली दिली आहे. आरोपी हा तरुणीच्या परिचयाचा आहे. खुन केल्यानंतर मृतदेह भिमानदी पात्रात फेकुन आरोपीने क्रुरतेचा कळस केला आहे. या घटनेमुळे तरुणींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

पिडित तरुणी बहिणीच्या लग्न कायार्चे सामान खरेदी आणि महाविद्यालीन क्लास साठी राजगुरुनगर येथे आली होती. यावेळी आरोपीने पिडित तरुणीला दुचाकीवरुन लिप्ट दिली. यावेळी घरी परत जाताना भिमानदी जवळील शेतात कामाचा बहाणा केला. पिडित तरुणीसोबत ओळख असल्याचा फायदा घेऊन आरोपीने तरुणीवर अत्याचार करुन खुन केला आणि पुरावा नष्ट करण्यासाठी तरुणीचा मृतदेह भिमानदीच्या पाण्यात टाकला. तरुणीची बॅग त्याने बाजुच्या विहिरीत टाकली. आरोपीला राजगुरुनगर पोलीसांनी अटक केली असुन आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली आहे.

# मुंबई छत्रपती शिवाजी महाराज विमानतळावर पावणे सात किलो सोनं जप्त
## एकीकडे सोन्याची भाववाढ, दुसरीकडे बँकॉकहून तस्करी

**मुंबई :** सोन्याचा भाव ९६ हजारांच्या घरात असताना बँकॉकमधून आणलेलं तब्बल पावणे ७ किलो वजनाचं सोनं मुंबई विमानताळावरून अमंलबजावणी व सक्तवसुली संचालनालयाने डीआरआयने जप्त केले आहे.

या प्रवाशाची अंगझडती करण्यात आली. यात प्रवाशाने घातलेल्या बुटात १४ सोन्याचे बार सापडले. बँकॉकहून मुंबईला जाणारे विमान टीजी २१७ ने प्रवास करणाऱ्या एका प्रवाशाला सोने तस्करी प्रकरणी अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी प्रवाशाला सोनं तस्करीसाठी कोणी दिले? या मागे कोणत्या टोळीचा हात आहे का? याचा तपास डीआरआयचे अधिकारी करत आहेत.

या घटनेमुळे मुंबई विमानतळावरुन सोनं तस्करीसाठी होणारे प्रयत्न पुन्हा एकदा उघड झाले आहेत. उफ्फ च्या सतर्कतेमुळे मोठ्या प्रमाणात तस्करी रोखण्यात यश मिळालं असून, या प्रकारामुळे तस्करीच्या पद्धती आणि त्यामागील रचनेचा पर्दाफाश होण्याची शक्यता आहे.

### मुंबईत डीआरआयला मोठे यश

मुंबईत अमंलबजावणी व सक्तवसुली संचालनालयाने उफ्फच्या पथकाला मोठे यश मिळाले असून बँकॉकमधून मुंबई विमानतळावर एका प्रवाशाला सोने तस्करी प्रकरणी अटक केली आहे. त्याच्याकडून अंगझडतीत प्रवाशाने घातलेल्या बुटात १४ सोन्याचे बार सापडले असून त्याचे एकूण वजन ६७३५.४२ ग्रॅम एवढे होते. या सोन्याची साधारण किंमत ६.३० कोटी रुपये एवढी आहे. तस्करी केलेले हे सोने जप्त करण्यात आले आहे. प्रवाशाला तसेच खरेदीदाराला सीमाशुल्क कायदा, १९६२ च्या तरतुदींनुसार अटक करण्यात आली.या प्रकरणीहे सोनं तस्करीसाठी कोणी दिले. या मागे कुठल्या टोळीचा हात आहे का ? याचा तपास डीआरआयचे अधिकारी करत आहेत.



# डोंबिवलीत रिक्षा चालकाचे भयानक कृत्य; गतिमंद महिलेला मुंब्राला नेले आणि...

**डोंबिवली :** महलांच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी धक्कादायक घटना डोंबिवलीत घडली आहे. डोंबिवलीत एका रिक्षा चालकाने गतीमंद महिलेवर बलात्कार केला आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. आरोपी रिक्षा चालकाला पोलिसांनी अटक केली आहे.

### डोंबिवलीत खळबळजनक घटना

फैजान खान असे अत्याचार करणाऱ्या रिक्षा चालकाचे नाव आहे. फैजान हा २१ वर्षांचा आहे. त्याने ३० वर्षाच्या महिलेवर बलात्कार केला आहे. टिळक नगर पोलिसांनी गुन्हा दाखल करत अवघ्या काही तासात आरोपी फैजान खानला बेड्या ठोकल्या.

डोंबिवलीत घडलेल्या या घटेमुळे खळबळ उडली आहे. गतिमंद महिला आपल्या नातेवांकडे जाण्यासाठी सोनार पाडा येथून रिक्षामध्ये बसली होती. आरोपी फैजल खान यांनी गतिमंद असल्याचा फायदा घेत पीडित महिलेला निश्चित स्थळी न घेऊन जाता आरोपी खान याने या महिलेला मुंब्रा येथे अज्ञात स्थळी नेले. येथे ओरपीने तिच्यावरती अमानुष अत्याचार केला आहे.

पीडितेने दुसऱ्या दिवशी सर्व प्रकार तिच्या आईला सांगितला. यानंतर तिच्या आईने पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. यानंतर सीसीटीव्हीच्या मदतीने पोलिसांनी आपली चक्र फिरवत आरोपी फैजल खान याला अटक केली. आरोपीला कल्याणच्या न्यायालयामध्ये हजर केले असता त्याला चार दिवसाची पोलीस कोठडी मिळाली आहे याप्रकरणी टिळक नगर पोलीस घटनास्थळी जाऊन या प्रकाराची चौकशी सुरू केली आहे आरोपीला कठोरात कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी होत आहे.



## वसतिगृहात २ अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार, मुलांना बेदम मारहाण

कल्याण-टिटवाळा जवळच्या खडवली येथे एका धक्कादायक घटनेने खळबळ उडाली आहे. जिल्हा महिला बाल कल्याण समितीने केलेल्या पाहणीत खडवली येथील पसायदान नावाच्या खाजगी वसतिगृहात दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याचे उघडकीस आले आहे. यासोबतच वसतिगृहातील मुलांना अनेक दिवसांपासून मारहाण केली जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकरणी कल्याण तालुका पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. तसेच वसतिगृहाच्या संचालकासह पाच जणांना अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वसतिगृहाचा कर्मचारी प्रकाश गुप्ता याने दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार केले. या घृणास्पद कृत्यामुळे परिसरात एकच संताप व्यक्त होत आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये वसतिगृहाचे संचालक बबन शिंदे, त्यांची पत्नी आशा शिंदे, मुलगा प्रसन्न शिंदे, शाळेतील शिक्षिका दर्शना पंडित आणि कर्मचारी प्रकाश गुप्ता यांचा समावेश आहे.

### वसतिगृहात मुलांना मारहाण

पसायदान या वसतिगृहात बेघर, निराधार आणि गरीब गरजू मुलांच्या राहण्याची सोय आहे. तसेच जवळच्या जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली जाते. सध्या या ठिकाणी १२ ते १५ मुले राहत असल्याची माहिती आहे. काही दिवसांपूर्वी या वसतिगृहात मुलांना मारहाण होत असल्याची तक्रार ठाणे जिल्हा महिला बाल कल्याण समितीकडे आली होती. या तक्रारीची दखल घेत समितीच्या अधिकाऱ्यांनी तातडीने वसतिगृहाची पाहणी केली.

### पाचही आरोपींना अटक

या पाहणीदरम्यान समितीच्या सदस्यांनी मुलांना विचारले असता मारहाणीची बाब समोर आली. अधिक चौकशीत कर्मचारी प्रकाश गुप्ता याने दोन अल्पवयीन मुलींवर अत्याचार केल्याचे उघड झाले. त्यानंतर तातडीने टिटवाळा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. यानंतर कल्याण तालुका पोलिसांनी तात्काळ कारवाई करत पाचही आरोपींना अटक केली. या घटनेमुळे कल्याण तालुक्यात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. निराधार मुलांवर अत्याचार करणाऱ्या या नराधमांना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. कल्याण तालुका पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400063 (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १03, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४0११0५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४0000१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com